लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१८ ला पुन्हा बसू इच्छित असलेल्या उमेदवारांचे (Repeater) अर्ज पाठविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः सेप्रप-१९१८/प्र.क्र.१/का-१७

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

तारीख: ०७ मार्च, २०१८.

वाचा-

१. **शासन परिपत्रक क्रमांकः सेप्रप-१९१८/प्र.क्र.१/का-१७, दि. ५ जानेवारी, २०१८.**

२. **शासन परिपत्रक क्रमांकः सेप्रप-१९१८/प्र.क्र.१/का-१७, दि. १ फेब्रुवारी, २०१८.**

शासन परिपत्रक -

मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील लिपिक-टंकलेखकांसाठी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा आयोजित करावयाची असून संबंधित उमेदवारांचे प्रशिक्षण दि. १ फेब्रुवारी, २०१८ च्या परिपत्रकान्वये आयोजित केले आहे.

२. दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ च्या परिपत्रकामध्ये नमूद उमेदवारांव्यतिरिक्त प्रशासकीय विभागातील जे लिपिक-टंकलेखक यापूर्वी विभागीय परीक्षेला बसून सदर परीक्षेत अनुत्तीर्ण झाले आहेत किंवा परीक्षेला अनुपस्थित राहीले आहेत, अशा उमेदवारांना लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१८ ला बसावयाचे असल्यास त्यांचे विहित नमुन्यातील अर्ज (त्या अर्जात उमेदवाराचे संपूर्ण नाव नमूद करून) प्रशासकीय विभागांच्या आस्थापना अधिकाऱ्यांनी अर्जातील सर्व तपशील बरोबर असल्याची खात्री करुन / प्रमाणित करुन या विभागाकडे निश्चितपणे दिनांक **३१ मार्च, २०१८** पर्यंत पोच होतील अशा पध्दतीने पाठवावेत . त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. विहित नमुन्यातील अर्ज मंत्रालय इंट्रानेटवर “आवेदन पत्र” या मथळ्याखाली उपलब्ध आहे.

३. ज्या पात्र उमेदवारांनी प्रस्तुत प्रशिक्षण आणि परीक्षेसाठी समक्रमांकित दि. ५ जानेवारी, २०१८ च्या परिपत्रकानुसार विहित मुदतीत अर्ज पाठविलेले नाहीत, परंतु ज्यांना सन २०१८ च्या परीक्षेला प्रथमच बसावयाचे आहे अशा उमेदवारांचे विहित नमुन्यातील अर्ज सुध्दा परीक्षेला पुन्हा बसणाऱ्या उमेदवारांच्या अर्जासोबत या कार्यासनाकडे **३१ मार्च, २०१८** पूर्वी पाठवावेत.

४. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सदर परिपत्रक संबंधित लिपिक-टंकलेखक यांच्या (प्रतिनियुक्ती वर / रजेवर असलेल्या लिपिक-टंकलेखक यांच्या सह) कृपया लेखी स्वरुपात त्वरीत निदर्शनास आणावे व त्यांची स्वाक्षरी घेऊन, ती कागदपत्रे आपल्या अभिलेखात जतन करुन ठेवावीत. एखाद्या पात्र उमेदवाराचा अर्ज छाननी करुन विहित मुदतीत या कार्यासनास प्राप्त झाला नाही तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवार आणि त्या विभागाची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०३०७१११४२६९६०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arati Shankar Desai

Digitally signed by Arati Shankar Desai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ef2d654ac80fbb94f45fef635ddbb5b5e9301a3a70a4f4298a52a5fd8bef5f42, serialNumber=49bc5a99b724c2018fcd117798aebf1146777ecb321b7b45309e97b033f098b8, cn=Arati Shankar Desai
Date: 2018.03.07 11:15:29 +05'30'

(आरती देसाई)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना),
२. निवडनस्ती.